राज्य योजना सन २०१७-१८
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना
(२४०६-A०९६)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी- ०४.१७/प्र.क्र.१२२/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ मार्च, २०१८.

वाचा :-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.७४/(A०९६)१६-१७/९२/१७-१८ दिनांक :-१९.०४.२०१७.
३. वित्त विभागाचे परिपत्रक कमांक :-अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४.१७ /प्र.क्र.१२२/फ-१, दिनांक :- ०३.०५.२०१८.
५. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८.
६. आता महसूल व वन विभाग शासन पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दिनांक १२.०३.२०१८.

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ राज्यस्तरीय योजनेअंतर्गत महराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना (२४०६-A०९६) या लेखाशिर्षांतर्गत रु. १३०.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भ क्रमांक १, ३ व ५ च्या वित्त विभागाच्या निधी वितरणाबाबतच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शन सुचनांन्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना (२४०६-A०९६) या लेखाशिर्षातंर्गत संदर्भ क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये रु. १०४.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

३. संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वे सुधारी अंदाजपत्रकामध्ये महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची स्थापना (२४०६-A०८७) या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १११.०० लक्ष निधी वितरीत करण्यास संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यास (विभागा प्रमुखास) प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

४. उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने महराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना (२४०६-A०९६) या योजनांतर्गत रु. ०७.००लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये महराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना (२४०६-A०९६) या योजनांतर्गत शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास अनसरुन खालील अटींच्या अधीन राहून रुपये ०७.०० लक्ष निधी खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. प्रस्तावीत खर्चः- लेखाशिर्ष २४०६, वनीकरण व वन्य जीवन, ०२, पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन ११०, वन्यजीवन संरक्षण (००) (२०) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना (०१) (सर्वसाधारण) २४०६ ए०९६ या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून आणि सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार खर्च करण्यात यावा.

२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा .

३. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

४. बांधकामे प्रस्तावित असल्यास शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधित जबाबदारी नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

५. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

६. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

७. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक:- १७.०४.२०१५ व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ व महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक:- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दिनांक १२.०३.२०१८ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दिनांक १२.०३.२०१८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१५३५४१३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.22 15:38:07 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
५. महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६. निवड नस्ती, फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई ३२.